दासबोधातील 'सोलीव सुखाचा' एक शास्त्रीय मागोवा

# सोलीव सुख

जयजयाजी सुद्गुरुवर्या । पूर्ण ब्रह्म प्रतापसूर्या । तुज नमोजी आचार्य । करुणासिंधो ॥१॥
जे भवसमुद्रीं पोळले । विषयमदें अंध जाहले । चौऱ्याशींत वाहू लागले । मार्ग सुचेना तयांसी ॥२॥
ऐसें विश्व बहुत बुडालें । मी जीव म्हणोनि धांवू लागले।मुळीचें स्मरण विसरलें । मी कोण ऐसें ॥३॥
तयासी मुक्त करावया पूर्ण । तूं बा उतरलासि ज्ञानघन ।रोगिया औषधी देऊन ।भवमोचन करिशी ॥४॥
ऐसें औदार्य तुझें सघन ।म्हणोनि आलों मी शरण। दयार्णवा कृपा करून । मज दातारें तारावें ॥५॥
आपण आपणातें पावे । ऐसें माझे मनीं बोलावें । तें दातारें गोचर करावें । रोकडें ब्रह्म ॥६॥
ऐसा शिष्याचा प्रश्न ऐकोनी । ज्ञानाचें भरतें आलें स्वामीलागोनी ।
आसन सांडोनियां तये क्षणीं । कडकडोनी भेटले ॥७॥
रे बाळका ! ऐक निर्धार । तुझा प्रश्न तो वाग्दोर। माझे कंठी बैसला साचार । बरें घेई निजवस्तु॥८॥
मग स्नेहाळें नवल केले । वोसंगासी शिष्या घेतलें। अर्धमात्रा रस काढिले । पूर्ण फुंकिले कर्णरंध्रीं॥९॥
खडतर औषधी दिव्य रसायन । नयनीं झोंबलें जाऊन । डोळियाचा डोळा फोडून। चित्सूर्य भेदिले ॥१०॥
पूर्ण अंश गगनी भेदिला । अर्क तो पिंडीमाजी उतरला । त्रिकूट श्रीहाट चुराडा केला ।
सेखीं भरला गगनगर्भीं ॥११॥
उग्र तेज लखलखाट।तेथें जाला चौदेहांचा आट ।भ्रांति पडली बळकट ।तेंव्हा बाळ निचेष्टित पडे ॥१२॥
ऐसें पाहोनि सद्गुरुनाथ । पद्महस्त मस्तकीं ठेवित ।वत्सा सावध त्वरित । निजरूप पहा आपुलें॥१३॥
जागृत करोनि ते वेळीं।अजपाची दोरी देउनी जवळी । विहंगम डोल्हारीं तयेवेळीं ।
अलक्ष्यलक्षीं बैसविले ॥१४॥
धैर्याचें आसन बळकट।आणि इंद्रियें ओढूनि सघट।धरें ऊर्ध्वपंथें वाट नीट ।अढळपदीं लक्ष लावी॥१५॥
पुढें करूनियां जाणिव। मागें सारोनि नेणिव । जे जे जाणिव अभिनव । ते तूं नव्हेसी तत्वता ॥१६॥
तैं मार्गाची करूं नव्हाळी ।प्रथम घंटानादाची नवाळी।
दुसरी किंकिणीची मोवाळी । तिसरी अनुहतकोल्हाळ ॥१७॥
आतां अग्रीं लक्ष लावी । काय दिसेल तें न्याहाळी। चंद्रज्योती प्रकाशली व्यूह बांधिला बळकट ॥१८॥
तें सुख अंतरी घेउनी । पुढें चाल करी संगमीं। तेथें विजुऐसा कामिनी। चमकताती सुवर्णरंग॥१९॥
तेही जाणोनि मागें सारी । पुढें सूर्यबिंब अवधारी। ज्वाळा निघती परोपरी। डंडळूं नको कल्पांतीं॥२०॥
वायोर्मुख करोनि तेथें ।गिळी वेगें सूर्यकिरणांतें ।मग देखसी आनंदमार्तंडातें। तेजोमय मम पुत्रा ॥२१॥
अनंत भानु तेज अद्भुत।खदिरांगार ज्वाळा उसळत । धारिष्ट तेथें न निभत । दुर्घट व्यूह तेथीचा॥२२॥
तेथें हुशारीचें काम।अग्रीं लक्ष लावोनि नेम।तीरें लावोनि सुगम । मागें सारी सूर्यातें ॥२३॥
पुढें दिसेल जे नवल । ते पाही हंसमेळ ।चंद्रकिरण शीतळ । पाहसी तूं मम वत्सा ॥२४॥

तेंव्हा मागील दाह शमेल । शीतळाई सर्वांग होईल। चंद्राची प्रभा सुढाळ। फडफडीत चांदणें ॥२५॥

तेचि डोळियाचा डोळा पाही ।देहातीत वर्म विदेंही ।चिन्मय सुखाची बवाई । भोगीं आपुले कीं गा॥२६॥

अनुभवाची शीग भरली।आग्रापरी उसळली ।भूमंडळीं प्रभा पडली । कर्पूरवर्ण नभ जालें ॥२७॥

तया मध्यभागीं सघन । अढळपद दैदीप्यमान ।उर्वरित ब्रह्म जाण । ध्रुव बैसला अढळ ते ॥२८॥

तें तुझे स्वरूप नेटेबोटें ।जेथें समस्त जाणणें आटे।ऐकें जालासी धिटे। बळकटपणें बलाढ्य ॥२९॥

ऐसें सुध योगियां लाधलें। तेव्हा देहाचें मरण गेले।सांगणें ऐकणें मुरालें । एकत्वपणें एकचि ॥३०॥

शांती येऊनि माळ घाली । अलक्ष्यसेजे निजली ।हंसपदें ऐक्य जाली । सुख सुखातें निमग्न ॥३१॥

तेथील अनुभव घेउनी । स्वानुभव पाहे कलटुनी ।आला मार्ग ते क्षणीं । दिसेनासा जाला कीं ॥३२॥

त्रिकूट श्रीहाट गोल्हाट । बुडालें ते औटपीठ ।इडा पिंगळा सुषुम्नातट। विराले ते स्वात्मसुखें॥३३॥

स्थूळ सूक्ष्म कारण। नेणों काय जालें महाकारण ।इंद्रियें चुबकलीं जाण । धांव मोडली तयांची॥३४॥

पंचभूतांचें खवलें । तयांचे ठावचि पुसले ।अपरिमित आनंदले । निमग्न जाले सुखांत ॥३५॥

सखोल भूमिके ऐसें जालें । सुख सुखासी घोटलें ।स्वयें आत्मत्व प्रगटलें । माझे देहीं रोकडें ॥३६॥

मग सहज समाधि जिरवून । शिष्य उठला घाबरा होऊन ।

हें सद्गुरूचें देणें । काय उत्तीर्ण म्यां व्हावें ॥३७॥

जरी स्तुती तयाची करावी। माझी मती नाही बरवी ।अनिर्वाच्य गती बोलावी । परा वाचा कुंठित॥३८॥

आतां जी मी लडिवाळपणें । तुमचें कृपेनें करितों स्तवन ।

सूर्यापुढें खद्योत जाण । तैशापरी बोल हे ॥३९॥

जयजयाजी करुणासिंधू । जयजयाजी भवरोगवैदू ।जयजयाजी बाळबोधू । कृपाघन समर्था ॥४०॥

जयजयाजी अविनाश । जयजयाजी परेशा । जयजयाजी अध्यक्षा । दयार्णवा ॥४१॥

जयजयाजी पूर्णचंद्रा । जयजयाजी अलक्ष्यविहारा।जयजयाजी भवसिंधुभास्करा । आनंद प्रभु ॥४२॥

तुझी स्तुती करितां सांग । वेदस्तुती जाले अब्यंग।तेथें प्राकृत मी काग । वर्णावया योग्य नव्हे ॥४३॥

कल्याण म्हणे जी रामदासा।माझा मुकेपणाचा ठसा।ते मोडोनि वसोसा । मज आपणाऐसें केलें॥४४॥

ऐकोन मृदुवचन । कुरवाळलें तयालागुन । गुरुशिष्य हें बोलणें । उरलें नाही ते वेळीं ॥४५॥

एकपणें एकचि जालें । ऐक्यरूपीं सम मिळालें ।करूनियां सुख उसळलें । नाहींपण जाउनी ॥४६॥

सुगरिणीचा पाक जाहला । नभाभाजनीं वाढिला ।अक्षयपदीं सुगरावला । संत जेवती स्वानंदें ॥४७॥

अनिर्वाच्य बोल बोलिले । साधकाचे उपेगा आले।सिद्ध तरी डोलों लागले । बद्ध मुमुक्षु होताती॥४८॥

यापरतें आन नाही बोलणें ।श्रीराम दाशरथीची आण। एकपत्नी तो सुजाण । आपुलें पद दे दासा॥४९॥

इति श्रीदासबोधग्रंथ । त्यांतील हा सोलीव अर्थ ।श्रोते ऐकतां यथार्थ । समाधिस्थ होती ॥५०॥

*श्रीसमर्थ रामदासकृत दासबोधातील सोलीव सुखाच्या निरुपणाला सुरुवात करण्याआधी... प्रारंभिच हे स्पष्ट करायला आवडेल की 'सोलीव सुख' हे समर्थकृत की कल्याणस्वामीकृत या वादात न जाता या रचनेच्या अभ्यासाकडे वळणार आहोत.*

सोलीव सुख हे थोडक्यात संज्ञा रुपाने मांडले तर हा एक गुरु-शिष्य संवाद आहे. ज्यात गुरुने शिष्याला त्याच्या बुद्धी व मनाच्या सहाय्याने योगशास्त्रातील चक्रजागृतीचा (मूलाधार चक्र, स्वाधिष्ठान चक्र, मणिपूर चक्र, अनाहत चक्र, विशुद्ध चक्र, आज्ञा चक्र, बिंदुस्थान चक्र, सहस्रार चक्र) अनुभव दिला आहे, थोडक्यात आनंदमय कोषाची अवस्था. येथे मला प्रथम एक गोष्ट स्पष्ट करायला आवडेल - सोलीव सुख हा माझ्या दासबोध-वाचनातील अभ्यासाचा-विषय आहे. तसे, अशी अनुभवसिद्ध व्यक्ती अशा अभ्यास-लेखाच्या गलबल्यात का अडकेल? पण तसा आनंदमय कोषाचा अनुभव घेऊनही पुन्हा सामान्यांशी संवाद साधणाऱ्या दोनच व्यक्ती गेल्या दशकात दिसताहेत-समर्थ रामदास अन् स्वामी विवेकानंद.

हे लिहिलेल्या या गुरु-शिष्याची पार्श्वभूमी वेगळ्या अंगाने समजावून घेऊयात... १६व्या शतकातील श्रीसमर्थ रामदासांनी केलेले धर्मकार्य अभ्यासू लागलो की लक्षात येते ती त्यांची असामान्य बुद्धीमत्ता-धैर्य-योगसामर्थ्य ! ज्याच्या मूळाशी तपश्चर्येच्या बरोबरीने अजून एक महत्त्वाची गोष्ट आहे. ती म्हणजे त्यांची १२वर्षांची तिर्थयात्रा जिचा पल्ला अफगाणीस्थान ते श्रीलंका असा होता. जो अगदी घोड्यावरून म्हणालो तरी एखाद्या हटयोग्यालाच शक्य व्हावा असा प्रवास! नंतरच्या आयुष्यातही त्यांनी स्थापन केलेल्या १०३९ मठांच्या व्यवस्थांसाठीचे भ्रमण. त्यात समर्थांनी प्रवासात अनेक शास्त्रांच्या अभ्यासाबरोबरीने अनेक हटयोगांशी भेटी घेतल्याचे पुरावे आहेत. या गोष्टी एकाच वेळी आपल्याला लक्षात घेऊन सोलीव सुख समजून घ्यावे लागेल. पुढची हजारो वर्षे सांप्रदाय तितक्याच ताकदीने चालू राहून तितकेच सामर्थ्यवान शिष्य घडावे त्यासाठी त्यांनी 'दासबोधा'सारख्या परिपूर्ण साहित्याची रचना करून ठेवली.

एका बाजूला समर्थ/कल्याणस्वामींनी मांडलेला गुरुशिष्य संवाद म्हटलं की समर्थांचे मुख्य २१ शिष्य व त्यांचे अध्यात्म-योगशास्त्र यावरील वर्चस्व लक्षात घ्यायला हवे. ज्या शिष्यांना प्रत्यक्ष समोर ठेवून ही रचना झाली त्यांची एक नामावली पुढील प्रमाणे - १. उद्धव गोसावी - टाकळी, जन्मापासून सांप्रदायी, २. कल्याणस्वामी- कृष्णाजीपंत बाभूळगांवकर यांचे पुत्र अंबादास, कोल्हापूर. ३. आक्का (चिमणाबाई)-कऱ्हाडास सुदाजीपंत कऱ्हाडकरांची लहान बालविधवा बहिण. सज्जनगड-मठाधिपती ४. वेणूबाई- (मिरज मठाधिपती) ५. सतीबाई शहापूरकर- बीजीपंतांच्या पत्नी त्यांच्यासाठी शहापूरला प्रताप मारुतीची स्थापना केली. ६.वासुदेव गोसावी (रामार्चन चंद्रिका हा संस्कृत ग्रंथ रामोपासनेवर लिहिला) ७. मुसळराम गोसावी (मसूर मठ) ८. अनंतभट - महाबळेश्वर (दिवाकरभट सोबत)९. *अंबिकाबाई* - *कोल्हापूर (राशीवडे व वाळवे मठांच्या अधिपती होत्या. दोन-दोन मठांच्या अधिपती अशा एकमेव.)* १०.*जयरामस्वामी* ११. *केशवस्वामी* १२. गिरिधरस्वामी (बीड मठ) १३. बाजीपंत - शहापूरकर १४. रोकडाराम . १५. रंगोबा गोसावी १६. भिकाजीबुवा १७. त्रिंबक गोसावी १८. देवीदास गोसावी १९. महादेव गोसावी २०. मोनी गोसावी २१. भोळाराम अशा मातबर परिवारालासमोर ठेऊन समर्थांनी सोलीव सुखाची रचना केली. त्यामुळे तुम्हा-आम्हास यात क्लिष्टता भासते. सरळ आहे, कधीही दोन योग्यांचा संवाद हा सामान्यांस उमगायला वेगवेगळ्या आधाराची आवश्यकता लागणार आहेच.

त्यामुळे पुढे शब्द जरी माझे असले तरी ज्या-ज्या पुस्तकांचे आधार मला घ्यावे लागले, त्यांचा नामोल्लेख लेखातच केला आहे कारण संशोधन त्या-त्या व्यक्तींचे आहे.

अर्थप्रवेश करताना समजावून घेऊयात,

मुलभूत योगशास्त्र-मानसशास्त्र आणि दासबोधातील संज्ञा त्यांचा परस्परसंबंध. योगशास्त्राचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे मन. त्यासाठी 'ध्यानापलिकडची योगयात्रा' या विमला ठकारांच्या पुस्तकाप्रमाणे खालील काही मुद्द्यांना लक्षात घेऊयात..

मनुष्य-प्राणी जन्मानंतर गतिशीलतेमुळे स्वतःच्या विकासाचा पहिला टप्पा पार पडतो. पुढे त्याला मेंदूच्या सहाय्याने जगण्यासाठीचे ज्ञान गवसते, मन आहे व काही प्रमाणात स्मृतींचा साठाही आहे. राग (आवड) द्वेषही आहे. आहार, निद्रा, भय, मैथुन या जाणिवा सर्वांमध्ये नैसर्गिक म्हणजेच प्राकृतिक आहेत. मानवी योनीची म्हणजे आपली इतर योनींपेक्षा अशी एक उन्नत दशा आहे, आणखी एक विशिष्ट क्षमता आहे, की जिच्यामुळे आपण विषयाचे वस्तूचे ज्ञान करून घेतो. त्याचवेळी आपण आहोत हे अस्तित्व व आपण आहोत याची जाणीव असते. त्या विषयग्रहणाचा परिणाम काय होत आहे, हे पण त्याचवेळी जाणत असतो. ती जाणीव म्हणजे बुद्धी - एक अलौकिक देणगी निसर्गाने दिलेली आहे. आपण जाणले याची जाणीव असणे, त्यामुळे राग (आवड) - द्वेष निर्माण होऊन त्या अनुभवांना आठवणींच्या रूपात तो स्मृतिकेंद्रात साठवून ठेवतो आणि गरजेनुसार ते स्मृतितरंग चित्तावर उमटतात व त्याप्रमाणे त्याचे कार्य-निर्णय चालतात. हा स्मृतींचा साठा त्याच्याकडे खूप मोठा असतो.

बापटशास्त्री अनुवादीत 'योगवासिष्ठ' उत्पत्ति अध्यायानुसार मानवेतर योनींमध्ये सर्व जीवमात्रांच्या ठिकाणी चित्त असले तरी फक्त मानवाचे चित्त बुद्धीच्या रूपात विकसित झालेले आहे. जोपर्यंत चित्त-बुद्धीचे रूप धारण करीत नाही, तोपर्यंत 'मुक्ती' नाही. इतर जीवांना मन असले तरी त्यांना एकदम मुक्ती मिळणे अशक्य आहे. कारण त्यांच्यांत बुद्धीच्या स्तरावरील तरलता व विकसनशीलता दिसत नाही. दासबोधात सांगितल्यानुसार या जाणीवांची सांगड आपल्या आराध्य-दैवताशी जोडली आहे, सद्गुरूशी जोडली आहे. त्यामुळे स्वतःच्या, स्वतःच्या बुद्धीच्या, मनाच्या अस्थित्वाबद्दलची श्रद्धा पहिल्या ओव्यांमध्ये जाणवते. त्यात समर्थांनी यासर्वांचे अधिष्ठान सद्गुरूंशी कायम जोडले आहे. सर्व प्राणिमात्रातील चैतन्यशक्ती व्यक्त स्वरूपात कलेकलेने कशी वाढत गेली आहे, हे समजून घेतल्यावर वरील विधानाचे नीट आकलन होईल. त्या एकंदर सोळा अवस्था आहेत. वृक्षापासून देवत्वापर्यंत वाढत गेल्या आहेत. शेवटची सतरावी अवस्था म्हणजे स्वानंदमयी जीवनकला होय. ती मानवाला प्रयत्नांनी साध्य करता येते. त्या अवस्थेलाच 'ब्रह्मस्वरूप' होणे, तिथे स्थिर राहणे असे म्हटले आहे. तीच 'कैवल्यप्राप्ती'. तीच मुक्तावस्था होय. त्या अवस्था कशा आहेत, त्या पुढीलप्रमाणे-

१) दगड-धोंडे-डोंगर :- यामध्ये ईशतत्त्वाची एक अवस्था आहे. ती म्हणजे 'अस्तिपणाची' होय. बघणाऱ्याच्या डोळ्याला दिसते म्हणजेच दृश्यमान होते. त्यांचे चूर्ण करून फुंकरेने अथवा वाऱ्याने उडविले गेले तर ते दृष्टीला दिसत नाही, पण अस्तित्व शिल्लक असते.

२) वृक्ष :- अवस्था दोन आहेत. अस्तिपणा व अन्न ग्रहण करण्याची क्षमता. लाकूड जाळले तरी राखेच्या स्वरूपात अस्तिपणा शिल्लक राहतोच.

३) क्षुद्र जीवजंतू :- अवस्था तीन आहेत. अस्तिपणा, अन्न ग्रहण करण्याची क्षमता, स्थानांतर करण्याची शक्ती.

४) पशु-पक्षी :- अवस्था चार आहेत. अस्तिपणा, अन्न ग्रहण करण्याची क्षमता, स्थानांतर करण्याची शक्ती व माता-पिता-घरटे ओळखण्याची शक्ती.

५) माणूसः-अवस्था पाच आहेत. अस्तिपणा, अन्न ग्रहणाची क्षमता, स्थानांतराची शक्ती, माता-पिता-घर ओळखतो, नवे संबंध जोडतो व टिकवतो. त्याची आठवण ठेवतो. कल्पित संबंध तोडू शकतो. आत्मा-परमात्मा संबंध ओळखू शकतो.

ज्ञान प्रबोधिनी खंड २ मधील डॉ. पिंडसेंच्या प्रबंधानुसार माणूस सत्त्वगुणी असेल तर तो सत्त्वगुण वाढवून परमार्थी होतो. हळू हळू सहा, सात, आठ, नऊ या अवस्था विकसित होतात. या विकसित करू शकतो. सर्व प्राणिमात्रातील व स्वतःमधील चैतन्य एकच आहे, हे समजल्यामुळे सर्वांच्या ठिकाणी समभाव उत्पन्न होतो. त्रिकालाची जाणीव होते. त्याचे ज्ञान प्राप्त होते. अतींद्रियता प्राप्त होते. दहावी अवस्था इंद्रियांच्या आकर्षणाच्या पलिकडची असते. तो परमात्म्याचा अनुभव प्राप्त करून घेऊ शकतो. त्याची प्रचिती घेऊ शकतो. स्वतःचा विकास साधू शकतो. जन्माचे सार्थक साधू शकतो, त्याला सिद्धावस्था म्हणतात.

या सिद्धावस्थेनंतरही अजून पाच अवस्था विकसित होतात. तो 'सर्वभूते रतः' होतो. वेदाचे पूर्ण ज्ञान होते. पूर्ण ऐश्वर्य प्राप्त होते. पूर्ण यश प्राप्त होते. मृतास जीवनदान देऊ शकतो. यानंतरच्या अवस्था सोळापर्यंत वाढतात. पण त्या भगवदीय आहेत. आणि सतरावी अवस्था म्हणजे मागे उल्लेख केलेली जीवनकला होय. या अवस्थांपेक्षा अजून विकसित झालेला जीव पृथ्वीतलावर दिसत नाही. अशा अवस्था विकसित झालेल्या मानवाचे शरीर कसे आहे, ते मानवेतर योनींपेक्षा कसे वेगळे आहे ते समजाऊन घेणे योग्य होईल. हे मानवी शरीर पंचमहाभूते व त्रिगुणांनी युक्त असे तयार झाले म्हणून त्याला 'अष्टधा प्रकृति' ने युक्त असे म्हटले जाते. तसेच ते पंचकोषात्मक आहे –

१) अन्नमय कोष : त्यालाच 'स्थूल देह' किंवा रचनात्मक शरीर म्हटले जाते. मातापित्यापासून प्राप्त झालेला हा देह जो पृथ्वी तत्त्व व आप तत्त्वाशी निगडीत आहे. त्याचा क्रियात्मक शरीराशी घनिष्ठ संबंध असतो. म्हणूनच पाचक रस तयार होऊन अन्नाचे पचन होते. तो अन्नरस सर्वत्र पेशींपर्यंत शक्तिच्या रूपाने पोचतो. नको असलेल्या भागाचे उत्सर्जन होते. पृथ्वी तत्त्वापासून हाडे, मांस तयार होतात व आपतत्त्वामुळे रक्त द्रवीभूत राहते.

२) प्राणमय कोष : अन्नावाटे व श्वसनावाटे सर्व शरीराला प्राणशक्ती देणारा, अंतस्थ शरीरातील भाग होय. याचा मज्जासंस्थेशी संबंध आहे. हा वायुतत्त्वापासून झालेला आहे. मन, बुद्धी यांचेही पोषण करतो. अन्नमय कोशाहून सूक्ष्म आहे.

३) मनोमय कोष : यालाच 'सूक्ष्म' देह म्हटले जाते. याचा अंतःकरणाशी संबंध आहे. अंतःकरणामध्ये मन, बुद्धी, अहंकार, चित्त यांचा समावेश आहे. हा कोष वायू तत्त्वापासून तयार झाला आहे. मन आणि बुद्धी यांच्या संबंधात याचे कार्य चालते. मनाद्वारे इंद्रियजन्य ज्ञान चित्तापर्यंत जाणवते. हा आधीच्या दोन कोषांहून अजून सूक्ष्म आहे.

४) विज्ञानमय कोष : यालाच 'कारण' देह म्हणतात. तो स्मृतिरूपाने जाणवतो. ज्ञानेंद्रियांद्वारे ग्रहण केलेले ज्ञान या कोषात स्मृतिरूपाने प्रथम साठवले जाते. स्मृतींचे तरंग गरजेनुसार अंतःकरणापर्यंत पोचवले जातात. वायू, तेज व आकाश तत्त्वांशी निगडीत आहे.

५) आनंदमय कोष : यालाच 'महाकारण' देह म्हणले जाते. त्याचे अस्तित्व जाणीवरूपाने जाणवते. स्मृती आणि जाणीव यात फरक आहे. ज्ञानेंद्रियांमार्फत आलेल्या बाह्य भौतिक ज्ञानाशी स्मृतींचा संबंध आहे. परंतु साक्षीरूपाने, अहंकारविरहित, अस्मितायुक्त 'मी' विरहित जी अनुभूती येते; ज्या अनुभूतीत कोणत्याही काळात, कोणत्याही देशात बदल होत नाही, जिला द्वंद्वावस्था नाही अशी अवस्था म्हणजे जाणीव होय. या कोशात समाधान, शांती याशिवाय कुठलाही तरंग उठत नाही. हा अनुभव ज्याचा त्याने घ्यावयाचा असतो.

**आनंदमय कोषातील अवस्थांचे सूक्ष्म**

*वर्णन शैलीत सुखाच्या अलंकारीक उपमांमध्ये दिसते.*

बापटशास्त्री अनुवादीत 'योगवासिष्ठ' उपशम-निर्वाण प्रकरणानुसार अंतःकरण अथवा चित्त असे म्हटले जाते त्यात मन, बुद्धी, अहंकार यांचा समावेश आहे. त्यातील मन हे दोन स्तरांवर काम करते. एक स्तर इंद्रियांनी युक्त आहे. कारण मनोवही स्रोतसे इंद्रियांपर्यंत पोचली नाहीत, तिथे मनाचा संयोग नसेल तर ती इंद्रिये ज्ञान ग्रहण करणार नाहीत व कृतीही करणार नाहीत. मनाचा दुसरा स्तर हा इंद्रियरहित भावनांच्या स्तरांवर कार्य करून अहंकाराला खत, पाणी घालीत असतो. अहंकार फुलवत ठेवतो. म्हणून मने दोन मानली जातात. अशा या मनाचा गुणधर्म आहे सतत संकल्प करण्याचा. विषय भोगण्याचा. ते सर्वगामी आहे. म्हणून स्वभाव आहे चंचलपणाचा. म्हणून ते स्थिर नसते. झोपेत स्वप्नदर्शीतसुद्धा ते कार्यवाही असते. परंतु ते वायुतत्त्वाने बनलेले असल्यामुळे जसे सर्वगामी आहे, पण ते प्रयत्नाने त्याला स्थिर करता येते. बुद्धीचा गुणधर्म आहे 'निश्चय' आणि स्वभाव आहे 'ज्ञान प्रकाशित करण्याचा.' ही बुद्धी सतत निश्चयात्मक स्वरूप मनापर्यंत पोचवते.

बुद्धीचे मनाच्या संयोगामुळे तीन दोष दिसतात. पहिला दोष पापवासना, पण हा दोष सत्कर्माने नाहीसा करता येतो. दुसरा दोष आहे संशयी वृत्ती. ती आत्मबलाने नाहीशी करता येते. आणि तिसरा दोष आहे आवरण. ब्रह्मस्वरूपाचे अज्ञान असते. अहंकाराच्या सान्निध्यामुळे कर्मफलाशा असते. परंतु आध्यात्मिक साधनेद्वारा हा दोष घालविता येतो. बुद्धियोगाचे प्रथम अंग आहे सत्कर्म. ज्या कर्मात आदिअंती सत्स्वरूप भगवंत असतो ते सत्कर्म मानले जाते. दुसरे अंग आहे, भगवंतावर पूर्ण भरवसा ठेवून प्रयत्नशीलता, हे आहे. इथे त्या ईशशक्तीवर गाढ श्रद्धा असते. आणि तिसरे अंग आहे भगवंताचे अनुसंधान. या तीन अंगांच्या साहाय्याने कर्मात आमूलाग्र बदल होतो. कर्मात निपुणता येते. चातुर्य व सौंदर्य दिसते. हेतू पवित्र असतो. कर्मफलाशा नसल्यामुळे अंतर्यामी संतोष असतो.

अशा या अष्टधा प्रकृती लाभलेल्या, नरदेहात जन्माला आलेल्या मानवाला अजून उत्क्रांत होण्याची इच्छा असते. त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची महत्त्वाकांक्षा असते. सुखप्राप्तीसाठी त्याचे सतत प्रयत्न चालू असतात. व्यक्तिगत अनुभवातून, इंद्रियजन्य ज्ञानातून व झालेल्या संस्कारक्षम ज्ञानातून राग-द्वेष निर्माण होतात. त्या स्मृतींच्या आधारे तो जीवन जगत असतो. मानवाचे जीवन जगण्याचे दोन प्रवाह दिसतात. दोन मार्ग दिसतात.

या विषयाची गहनता अफाट आहे – फक्त अभिमान याच गोष्टीचं आहे की समर्थांनी धर्मसंरक्षणार्थ उभा केलेलं एक संघटन म्हणजे रामदासी संप्रदाय. अशा संप्रदायाला पुढे हजारो वर्ष चालू ठेवायच्या महत्त्वकांक्षेने त्यांनी बुद्धीमान-स्थितप्रज्ञ अशा 'रामदासा'ची (समर्थ-शिष्याची) प्रतिमा मध्यवर्ती ठेऊन या गोष्टींची रचना केली आहे. १६ व्या शतकाच्या दरम्यान धर्मसंरक्षणासाठी अनेक संत-महंत झटत होते. आपापल्या परीने प्रयत्न करीत होते. सगुण भक्तीत आडकून राहिलेला समाज संघटीत करण्याचा विचार पहिल्यांदा समर्थांनी केला.

वैयक्तिक हरिभक्ती धर्मकार्याला जोडण्याची ताकद दिसत नाही. धर्मकार्यातून-समाजपरिवर्तनाच्या कामाला जोडलेले दिसत नाही.

असो, 'समर्थ' गुरुस्थानी असल्याने त्यांचा अंतरंग जाणायचा हा वेडाप्रवास अखेरपर्यंत चालू राहाणार आहेचं.

स्वामी सत्यानंद सरस्वतींच्या

लिखाणातील एक आवडलेल्या कडव्याने या भावानुवादाचा समारोप करायला आवडेल –

"विश्वाचे कोडे उलगडून त्या विश्वात असणाऱ्या ईशतत्त्वाशी समरस होण्याचा एक मार्ग व दुसरा मार्ग म्हणजे इंद्रियजन्य ज्ञानाच्या आधारे, बुद्धिजन्य प्रयत्नातून भौतिक विज्ञानाद्वारे जीवन जगत सुखोपभोग घेत जगण्याचा. कोणत्या पद्धतीने आचरण करावयाचे याचे स्वातंत्र्य निसर्गाने मानवाला बहाल केले आहे."

– मनीषा बाठे,
५२२ नारायण पेठ, पुणे